# आजचे उत्सव -- श्रद्धेचे बाजारीकरण

लेखक: प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

[कोथरूड ज्ये. ना. संघाचे संस्थापक श्री. व. कृ. धामणकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ घेतलेल्या २०११-१२ तील निबंधस्पर्धेतील प्रथम क्रमांकाचा निबंध]

उत्सव म्हटले की आपल्या समोर येतो गणेशोत्सव. महाराष्ट्रात आणि त्यातही पुण्यातील प्रमुख उत्सव म्हणजे गणेशोत्सव. या उत्सवाचे सध्याचे स्वरूप पाहणे उदबोधक ठरेल.

श्रीगणेश हे महाराष्ट्राचे आद्य दैवत. महाराष्ट्रातील प्रत्येक गावी, खेडेगावात सुद्धा गणपतीचे एक तरी मंदिर असतेच. घरोघरी श्रीगणेशाची रोज पूजा होते. प्रत्येक समारंभापूर्वी गणेशाची स्थापना/वंदना हा आवश्यक विधी असतो. पुण्यातील कसबा गणपती, तळयातला गणपती, मुंबईचा लालबागचा राजा हे प्रतिष्ठेचे गणपती नवसाला पावणारे म्हणून महनीय आहेत. पुण्याभोवती अष्टविनायकांचे एक संरक्षक कडेच आहे. तेव्हा या आदि दैवताचा सार्वजनिक उत्सव दणक्यात, थाटामाटात साजरा व्हावा हे योग्यच आहे.

धार्मिक स्वरूपात अडकलेल्या गणपतीला लोकमान्य टिळकांनी एक सामाजिक व राजकीय वलय दिले. स्वातंत्र्याच्या चळवळीत अधिक लोकांनी सहभागी व्हावे, चळवळीचा प्रसार तळागाळापर्यंत पोचावा म्हणून त्यांनी या धार्मिक उत्सवाला राजकीय व सामाजिक आशय दिला. देखाव्यांच्या द्वारे व संगीताच्या, संवादांच्या सहाय्याने लोकातील देशप्रेम उफाळून यावे, सक्रीय व्हावे अशा हेतूने त्यांनी करमणूकीचा उपयोग जनजागृतीसाठी केला. १९२० ते १९५० हा काळ गणेशोत्सवाच्या राजकीय उत्थानाचा समारोह होता. स्वातंत्र्यानंतरही काही काळ गणेशोत्सवाचे हे जनजागृतीचे स्वरूप चालू राहिले.

१९८० नंतर भारतीय जीवनाचे सर्वच स्वरूप पालटायला लागले. पाश्चात्य जीवनाचा, विचारसरणीचा प्रभाव वाढू लागला. मुक्त जीवनाच्या वाऱ्याने भारतीय संस्कृतीला धक्के बसू लागले. भारतीय संस्कृती जपणारा मध्यम वर्ग श्रीमंत होऊ लागला. फारसे कष्ट न करता भरघोस पैसा हाती येऊ लागला. त्यामुळे कमाई जपून वापरावी व शिलकीवर भर द्यावा ही मध्यम वर्गाची जीवनमूल्ये हास्यास्पद ठरली. त्या ऐवजी 'Use and throw -- कमवा व भोगा' ही अमेरिकन जीवनपद्धती सगळीकडे रूजू लागली. चंगळवादाने भारतीय युवा पिढीला व उत्सवांना ग्रासले.

उत्सवाच्या नावाखाली लोकांकडून वर्गण्या गोळा करायच्या, दुकानदार, व्यावसायिक यांना मोठ्या देणग्या द्यायला भाग पाडायचे, त्यासाठी राजकीय मातबरांचा व पोलीस यंत्रणेचा उपयोग करायचा, आणि जमलेल्या रकमेतून स्वत:ची हौस भागवायची हा गणेशोत्सवाचा राजमार्ग झाला. सामाजिक गुंडांनी व मतलबी पुढाऱ्यांनी गणेशोत्सवाचा ताबा घेतला व त्यांच्या छोट्या चमच्यांनी त्यांच्या

आश्रयाखाली चैनबाजी सुरू केली. गणेशोत्सव एक बाजारी व्यवसाय झाला. मोक्याच्या जागी मांडव उभारायचे, गणेशमंडळे स्थापन करायची, त्यांचे नेतेपण पुढाऱ्यांना, महापालिकेच्या नगरसेवकांना बहाल करायचे व त्यांच्या नावाखाली गल्लीबोळातल्या नेत्यांनी जनतेची लूटमार करायची. या गणेशोत्सवी पुढाऱ्यांनी अशी दुष्टचक्रे निर्माण केली आहेत की त्यांना वर्गणी नाही म्हणायची कोणाची हिंमत होत नाही. जमाखर्च कोणी ठेवत नाही, कोणी विचारत नाही. कार्यकर्त्यांना भरपूर खायला घातले की ते खूष; उत्सवाद्वारे पुढाऱ्यासाठी कार्यकर्त्यांची एक फौज उभी राहते व ती निवडणुकीच्या वेळी उपयोगी पडते, त्यामुळे ते खूष! गणेशोत्सव हा असा बाजार झाला आहे - श्रद्धेचा, भाविकतेचा, भक्तीचा! सामान्य माणूस देखावे बघतो, कार्यक्रम पाहतो, विसर्जनाचा सोहळा गॅलरीतून किंवा टी. व्ही. वर पाहतो व 'छान झाला यंदाचा गणेशोत्सव' म्हणत चतुर्दशीच्या रात्री झोपी जातो. लक्षावधी रुपयांचा झालेला चुराडा त्याच्या गावीही नसतो.

पण सुजाण मनाला जाणवते, हा उत्सव असेल, पण हा गणेशोत्सव नाही. कुठे आहे ती भक्ती, ती श्रद्धा, ते गणेशाचे माहात्म्य? ना पूर्वीची देवभावना, ना टिळकांची सामाजिक जाणीव - राहिले आहे ते एक महोत्सवाचे प्रचंड विडंबन!

गणेशोत्सवाच्या दरम्यान अनेक गैरसोयी सर्वसामान्य लोकांना सोसाव्या लागतात. रस्त्यावरच उभारलेल्या मांडवामुळे व देखाव्यामुळे वहातुकीचा खोळंबा होतो. शाळेला जाणारे विद्यार्थी, डॉक्टरांकडे निघालेले रुग्ण, दैनंदिन येजा करणारे प्रवासी यांची खूप गैरसोय होते. रात्री १० वाजता ध्वनीवर्धक बंद करावेत असा जरी नियम असला तरी दिवसभर व रात्रीसुद्धा नियम मोडून कानठळ्या बसेपर्यंत सुरेल किंवा बेसूर संगीत ऐकण्याचा जुलूम सोसावा लागतो. गुलालामुळे हवा प्रदूषण, कर्कश संगीतामुळे ध्वनीप्रदूषण, मूर्तीविसर्जनानंतर जलप्रदूषण व गर्दीगोंगाटामुळे वातावरणप्रदूषण या सर्व असह्य गोष्टींना सामान्यांना तोंड द्यावे लागते. पण उत्सवाचा बाजार मांडणाऱ्यांना त्याचे काय सोयरसुतक?

गणेशोत्सवानंतर येणारा नवरात्र उत्सव हा एक वेगळ्या प्रकारचा बाजार आहे. ९ रात्री गरबा खेळण्याच्या निमित्ताने तरूण तरूणींना एकत्र येऊन सलगी करण्याची संधी देणारा हा उत्सव. आजकाल मुली सुद्धा 'बिनधास्त' वागण्याची ही संधी सोडत नाही. चंगळवादाने व पाश्चात्य विचारांनी पोसलेले हे स्वैराचाराचे स्वातंत्र्य आहे. मूळच्या गुजरात-राजस्थानचा हा उत्सव; महाराष्ट्रियन तरूण-तरूणींनी या एका आकर्षणामुळे हौसेने स्वीकारला आहे.

यानंतरचा 'इंपोर्टेड' उत्सव म्हणजे 'होळी'. वास्तविक पूर्वी महाराष्ट्रात फाल्गुन पौर्णिमेला होळी पेटवायची, तिची पूजा करायची एवढेच त्याचे निरागस स्वरूप होते. पण आता उत्तर हिंदुस्तानी व हिंदी सिनेमांच्या प्रभावामुळे एकमेकावर रंग उडवणे व त्यातही तरूण-तरूणींनी या निमित्ताने एकमेकांशी लगट करणे हेच त्याचे बाजारी स्वरूप उरले आहे.

आता यात भर पडलीय काही पाश्चात्य उत्सवांची. Valentine's Day या उत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रीय युवापिढी स्वैराचाराचा इतका अतिरेक करू लागली की शिवसेनेला आंदोलन करून तो थांबवावा लागला. जगभर नाताळला आणि हिंदुस्थानात ३१ डिसेंबरला विकृत चंगळवादी स्वरूप येऊ लागले आहे (अर्ध्या तासाच्या नाचाला दोन कोटी रुपये). परवा नाताळच्या संध्येला लोकांना उद्देशून केलेल्या 'पवित्र संदेश' वाचनात १६ वे पोप बेनेडिक्ट हीच खंत व्यक्त करीत आहेत:

'सध्या उपभोगी वृत्तीचे प्रमाण वाढते आहे. ख्रिसमसचेही बाजारीकरण झाले आहे, त्यामुळे ख्रिस्त जन्माचे पावित्र्य लोप पावत चालले आहे.'

भारतात हेच होते आहे.

महाराष्ट्रातील उत्सवांचे हे उबग आणणारे बाजारी स्वरूप उत्सवामागील पवित्र कल्पनांना, भावनांना छेद देणारे आहे. या बदलाचे कारण आहे पाश्चात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव आणि तिने आणलेला चंगळवाद. १९८० नंतर या चंगळवादाने भारतीय तरूण पिढीला पकडीत धरले आहे. 'भल्याबुऱ्या मार्गाचा विधीनिषेध न बाळगता पैसा मिळवणे व तो चैनीत, मौजमजेत खर्च करणे म्हणजे चंगळवाद!' 'संपत्ती म्हणजेच यश' हे चंगळवादाचे ब्रीदवाक्य आहे. यंदाच्या पहिल्या युवा साहित्य-नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अच्युत गोडबोले आपल्या 'चंगळवादाचे थैमान' या पुस्तिकेत म्हणतात,

"अत्यंत वाईट मार्गाने जरी पैसा मिळवला असला तरी त्या लोकांचे, उद्योजकांचे, राजकारण्यांचे होणारे सत्कार, त्यांच्या मागे मागे फिरणारे नुसते चमचेच नव्हे, तर विकत घेतले जाऊ शकणारे तथाकथित बुद्धिवादी हे सगळे एकच संदेश देत असतात - पैसा हाच आयुष्यात सगळ्यात मोठा असतो, त्याच्या जोरावरच प्रतिष्ठा, प्रेम, प्रसिद्धि, मैत्री, सुंदर जोडीदार आणि इतर अनेक गोष्टी विकत घेता येतात."

या चंगळवादापुढे सर्व पवित्र भावना, सर्व नीतिमूल्ये पायदळी तुडवली जात आहेत, सर्व जीवनमूल्यांचा बाजार मांडला जात आहे.

हे बाजारीकरण थांबवणे अवघड आहे. छोट्या मोठ्या कामासाठी लाच देणारा नाडलेला गरीब भ्रष्टाचारमुक्त होणे जसे अवघड आहे तसेच पैशाने मिळणाऱ्या मौज मजेसाठी हपापलेला समाज सुधारणे अशक्यप्राय आहे. थोडी फार आशा आहे (silver lining) ती अल्पसंख्येने सापडणाऱ्या युवा मंडळींची, जी आज भ्रष्टाचारविरोधी अण्णा हजारेंच्या पाठीमागे उभी राहण्यास तयार आहेत. चंगळवादी समाजव्यवस्थेऐवजी वेगळी सेवाभावी समाजव्यवस्था निर्माण करणे शक्य आहे; असा आशावाद व्यक्त करताना डॉ. गोडबोले म्हणतात, "या व्यवस्थेत प्रत्येकजण अनावश्यक खर्च टाळेल व आपला व्यवसाय समाजसेवेच्या भावनेतून करेल. अवघड वाटतेय हे, पण असा एक युवक वर्ग पुढे येत आहे तोच हे बाजारीकरण थांबवू शकेल."

प्रस्तुत लेखकाला अशा काही युवा व्यक्ती भेटल्या आहेत, ज्यांनी त्याला अनाहुतपणे मदत केली आहे व त्याचे कष्ट कमी केले आहेत, व चांगले सेवाभावी युवक अस्तित्वात आहेत याची साक्ष दिली आहे.

तोपर्यंत........................

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 25881194
Email: joshi.bindumadhav@gmail.com